Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

Current Global Reviewer (Peer Reviewed) | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7.139, Special Issue – 131 | April. 2020

**प्रा.डॉ.बाजीराव माणिकराव पाटील**
21. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेशैक्षणिक कार्ये 58
**श्री.डॉ.सुदर्शन व्यंकटराव सोनवणे**
22. "साहित्य में वैश्वीकरण की प्रासंगिकता" (विशेष संदर्भ - ममता कालीयाका दौड उपन्यास) 60
**प्रा.डॉ.जाधव के.के.**
23. स्वच्छभारतअभियानप्रभाव एवंकठिनाईयाँ 62
**श्रीमतीटीनाजोशी**
24. सेंद्रिय शेतीची अपरिहार्यता 69
**प्रा.बी. एस. जोगदंड**
25. धारकर पवार घराण्यातील उदाजीराव पवारांचे कार्य 72
प्रा.डॉ.सुनिल रजपूत
26. पंडितजवाहरलालनेहरू यांचेआलिप्ततावादी धोरणआणिपंचशीलतत्वे 74
**डॉ. संतोषबाबुरावकु–हे**
27. दलित स्त्री और दोहरा अभिशाप 76
**डॉ. मोहनन वी टी वी**
28. सामाजिकसंशोधन आणि अर्थशास्त्रीयसंशोधन पध्दती एक अभ्यास 79
**डॉ.सुरेश भा.ढाके**
29. प्रमाण भाषा व बोली 82
डॉ.सुनीता पुरुषोत्तम सांगोले
30. निराला और मुक्तिबोध का हिन्दी काव्य पर प्रभाव 86
**डॉ.ढाणकीकर शोभा नारायणराव**
31. महाकवीअश्वघोष लिखितमहाकाव्यातीलस्त्रीविषयकविचार 89
श्रीमती. मुदलियारशकुंतलारामन
32. अध्यापन पध्दती व व्यावसायिक विकास घडवून आणणाऱ्या सुधारणा 92
डॉ. सतीश नारायण लोमटे
33. हस्त भरत कला – मार्गदर्शन आणि उपयोगिता हस्त–भरतकलेचा इतिहास : 95
डॉ. एम.एन साखळकर
34. नांदेड जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येचे जमातीनिहायलिंगगुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास (२०११) 98
देवकर आनंदा मारोती , डॉ. एस. व्हि. ताठे

Current Global Reviewer (Peer Reviewed) ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7.139, Special Issue –131 Aug. 2010

# प्रमाण भाषा व बोली

डॉ.सुनीता पुरुषोत्तम सांगोले
दयानंद कला महाविद्यालय,लातूर (महाराष्ट्र)

भाषा विज्ञानात प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यासंबंधीचे विवेचन विस्तृत प्रमाणात केलेले दिसून येते. प्रमाणभाषेच्या संदर्भात भाषा अभ्यासकांनी विविध विचार मांडले आहेत. प्रमाणभाषा म्हणून महत्त्व प्राप्त होण्यासाठी एखाद्या भाषेला विविध अशा गोष्टींची आवश्यकता असते. बोलीला प्रमाणभाषा ठरण्यास त्या भागाचे राजकीय वर्चस्व महत्वाचे असते. तसेच त्या बोलीचा एखादा महान ग्रंथकार असणे आवश्यक असते. प्रा.अ.का. प्रियोळकर यांनी 'प्रमाण' मराठी कशी ठरली ? हे सांगताना,' देशी भाषेमध्ये ग्रंथलेखन करण्याला त्या काळी जो विरोध झाला त्याला तोंड देऊन ज्या लोकांनी मराठीमध्ये लिहिण्याचा प्रथम पायंडा पाडला, त्या लोकांची बोली पुढील 'प्रमाण' भाषेचा पाया ठरली. केवळ महाराष्ट्रातच हा प्रकार आहे असे नाही तर जगातील कोणत्याही भागात प्रमाणभाषा अशीच निर्माण झालेली दिसून येते.

डॉ.स.गं. मालशे यांनी प्रमाणभाषा आणि उपभाषा वा बोली यांच्या व्याख्या करण्याच्या संदर्भात दोन तत्त्वे ध्यानात घेतली ती तत्त्वे म्हणजे आकलन आणि विनिमय. कोणत्याही प्रदेशातील किंवा राज्यातील मुख्य शहरामधील सुशिक्षितांच्या बोलण्याला 'प्रमाणभाषा' असा शब्द योजला जातो. संवादापुरतीच ग्रामीण बोली स्वीकारली जात असे. नंतर तर संपूर्ण निवेदनासाठी बोलीचा स्वीकार केला जाऊ लागला.

सामाजिक व्यवहारात अनेक भाषा आहेत. त्यांच्या भाषिक परंपरा रुढ आहेत. परंतु जेव्हा आपण प्रमाणभाषा म्हणतो तेंव्हा आपल्या सोयीसाठी म्हणून लेखन, त्यामार्फत शिक्षण, राज्यकारभार, वर्तमानपत्रे, कार्यालये या माध्यमांशी संबंध जोडतो. कारण तेथे एक भाषिक रुप आहे. आणि विविध प्रकारच्या पोटभाषा बोलणारे एका भाषिक रुपाशी संबंधित राहतात. हे सर्व केवळ व्यक्तीच्या बोलीपेक्षा व्याकरणच्या नियमांनी अनुसरुन असते. या सर्व प्रयोगांनाच ना.गो. कालेलकरांनी 'आदेशात्मक भाषिक रुप' मानले आहे.

प्रमाणभाषा ही विविध बोलींचीच एक परिणत अवस्था असते. हे वास्तव आहे. परंतु ती प्रमाणभाषा म्हणून रुप घेत असतानाच ती हळूहळू आपल्या बोलीभाषेत अस्सल ग्रामीणत्त्व कमी करुन आणि कालांतराने बोलींच्या स्वरुपांहून वेगळे असे प्रमाण ग्रांथिक रुप धारण करते. यामागे विविध प्रादेशिक बोलीभाषांना आपले रुप एकच स्पष्ट व्हावे हेच तिचे प्रयोजन असते. तरीही या हेतुमुळे ती दिवसेंदिवस बोलीभाषेहून वेगळी होत असते. अशा अवस्थेस गं.ब. ग्रामोपाध्ये म्हणतात की, " तिला ग्रांथिक स्वरुप देऊन सुप्रतिष्ठित करणारे ग्रंथकार व त्यांचे ग्रंथ जर मोठ्या योग्यतेचे असतील, तर त्यांच्या प्रभावाने त्यांनी योजलेल्या ग्रांथिक भाषेला जशी बहुजन-मान्यता लवकर मिळते, तशीच शिष्टमान्यता ही तिला सहज मिळू शकते.

प्रमाणभाषेला शिष्टांची भाषा, पुणेरी, सुशिक्षितांची भाषा असे म्हटल्याने ती काही अशिष्टांची भाषा ठरत नाही. म्हणूनच अरविंद मंगरुळकर म्हणतात,"ज्या मराठी भाषेच्या व्याकरणाचा पुर्नविचाराला आपण प्रवृत्त झालो आहोत, ती ही आपण मान्य केलेली भाषा होय. यावेळी आपण उभयतांनी ती काही विचार विमर्शासाठी प्रमाण मानलेली आहे म्हणून तिला वाटल्यास आपण 'प्रमाणभाषा' म्हणू या. असे म्हटले तरी सोयीसाठी आणि इतरही काही विचार लक्षात घेऊन या भाषेला 'प्रमाणभाषा' असे म्हणणे योग्य होईल असे म्हटले आहे.

प्रमाणभाषा ही ग्रांथिक भाषा असल्यामुळे तिच्यातील व्याकरणिक नियमांनी कृत्रिम वाटत असते. तिच्यातील जिवंतपणा ती गमावून बसलेली असते. म्हणून डॉ. ग.ना. जोगळेकरांनी, "अशा या प्रमाणभाषेला इतर बोलींशी जो संबंध येतो तो थेट येत नाही तर तो 'प्रमाणबोली' च्या द्वारे येतो." असे म्हटले आहे.

प्रत्येक व्यक्ती जीवन जगत असताना तो आपल्यापेक्षा वरचढ, पुढारी वर्गाशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत असतो. त्यामुळे खेड्यापाड्यांना जवळच्या शहराची भाषा प्रमाण बनते. या संदर्भात मु.ग. पानसे यांचे मत असे आहे की, "शहरात सुद्धा सामाजिक, शैक्षणिक किंवा राजकीयदृष्ट्या जो वर्ग पुढारलेला असेल किंवा जीजात अग्रेसर असेल त्या वर्गाची किंवा जातीची भाषा प्रमाण मानली जाते. ती आदर्श वाटते म्हणून समाजातील इतर सर्व लोक तिचा स्वीकार करतात."

भौगोलिक किंवा सामाजिक कारणामुळे निर्माण झालेल्या भाषा-भेदांना सामावून घेणारी त्या-त्या समाजाची अशी जी, एकसंघ भाषा मानली तिला प्रमाणभाषा म्हणतात. डॉ. दत्तात्रय पुंडे प्रमाणभाषा : स्वरुप व वैशिष्ट्ये सांगताना प्रमाणभाषेच्या संदर्भात पुढीलप्रमाणे व्याख्या देतात,"एका विस्तृत प्रदेशात बोलली जाणारी, अनेक बोली-भेदांना व स्थानिक-भेदांना समाविष्ट करुन घेणारी राजकारण, समाजकारण, संस्कृती व शिक्षण या क्षेत्रांमध्ये वापरली जाणारी आणि समाजाकडून लेखन व्यवहारासाठी स्वीकारली गेलेली भाषा म्हणजे प्रमाणभाषा म्हणता येईल."

प्रमाणभाषा ही भाषिक समाजातील सर्व व्यक्तींना समजली जाणारी, समाजातील 'शिष्ट' लोकांनी लेखनासाठी मान्य केलेली भाषा होय. "ज्या लेखनाला 'शुद्ध' म्हटले जाते ते शिष्टमान्य लेखन ज्या भाषेसाठी केले जाते ती प्रमाणभाषा होय." असे मत सुहासिनी लद्दू यांनी मांडले.

एखाद्या विस्तीर्ण प्रदेशात सर्वमान्य झालेली प्रमाणभाषा त्या प्रदेशातील सर्व भागांत सुशिक्षित, सुसंस्कृत, म्हणजेच नेतृत्त्ववर्गातील लोक आपल्या नित्य व्यवहाराचे माध्यम म्हणून बोली स्वरुपातही वापरत असतील तर ती प्रमाणभाषा त्यांची स्वप्रमाणबोली ठरते.

**Current Global Reviewer (Peer Reviewed)** | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7.139, | Special Issue –131 | Aug. 2010

विशिष्ट भाषिक प्रयोग, वाक्प्रचार, म्हणी या सर्वांचा विचार करणे आवश्यक ठरते. आणि यासाठी भाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून या बोलीचे विश्लेषणही करावे लागते.

आत्तापर्यंत आपण प्रमाणभाषा व बोलीभाषा यांच्यासंदर्भात अनेक अभ्यासकांची मते पाहिली. बोलीभाषेच्या संदर्भात भाषा अभ्यासकांच्या विचारात विविधता दिसून येते. काही भाषाशास्त्रज्ञांच्या मते बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. तर काही भाषापंडितांच्या मते पोटभाषासुद्धा लहानशा का होईना पण समाजाची भाषा असते, व्यक्तीची नसते. तसेच ते भाषेवर उमटणाऱ्या मोठ्या ठशाला महत्त्व देतात. काही भाषाशास्त्र विचारवंत मूळ एका भाषेपासून निघालेल्या भाषांत काही साम्य व काही भेद दिसून येतात याचा विचार करतात. तर भाषेतील बहुविध स्वरुपांना महत्त्व देणारे काही भाषाभ्यासक आहेत. काही भाषाशास्त्र विद्वान ज्या व्यक्तिगत बोलीत जास्तीत जास्त साम्य असते याचा विचार करतात तर काही भाषाशास्त्रज्ञ मूळ भाषेपेक्षा वेगळेपणा व साम्य धारण करणारी कोणतीही सीमित क्षेत्राची वा कालाची भाषा म्हणजे पोटभाषा म्हणतात तर काही भाषाभ्यासक मूळ भाषेच्या स्वरुपात व प्रचलित स्वरुपात किती प्रमाणात फरक पडला आहे, हे पाहूनच आपण एकीस भाषा व दुसरीस बोली असे नाव देतो असे दिसून येते.

आत्तापर्यंत आपण प्रमाणभाषा व बोलीभाषेचा साकल्याने विचार केला. यानंतर प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यातील फरक तपासून पाहू.

**प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यातील फरक :**

भाषा हे विचार, अनुभव, भावना व्यक्त करण्याचे एक प्रभावी साधन आहे. सामाजिक व्यवहार भाषेमुळेच शक्य होतात. भाषा व बोली यांच्यात वस्तुतः भाषिकदृष्ट्या फरक नाही. परंतु 'भाषा' ही 'बोली' च्या तुलनेत शुद्ध मानली जाते. भाषाशास्त्राच्या दृष्टीने भाषा व बोली यांच्यात फारसा फरक नाही. या संदर्भात श्री. न. गजेंद्रगडकर म्हणतात,"सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कारणामुळे एका विशिष्ट बोलीला भाषेचा दर्जा मिळतो, मान्यता मिळते." असे असले तरी प्रमाणभाषा व बोलीभाषा यातील फरक आपणास दिसून येतो.

१. भाषेच्या किंवा प्रमाणभाषेच्या अंतर्गत एक वा अधिक बोलींचा समावेश घेऊन शकतो. बोलीभाषेमध्ये भाषा समाविष्ट करता येत नाही. बोलींच्या समूहाला सामावून घेणारे भाषा हे एक वर्तुळ आहे, तर बोली ह्या त्या वर्तुळाच्या घटक आहेत.
२. प्रमाणभाषेचे आकलनक्षेत्र विस्तृत असते तर बोलीभाषेचे आकलनक्षेत्र हे मर्यादित असते.
३. प्रमाणभाषेमुळे विविध बोली बोलणारे एकमेकांना जोडले जाऊ शकतात. बोलीमुळे मर्यादित प्रमाणातील ग्रामीण जीवन शक्य व सुकर बनते.
४. ग्रामीण समाज साचेबंद असतो, त्यात अंतर्गत विविधता नसते. साहजिकच ग्रामीण बोली मर्यादित बनतात. प्रमाणभाषेच्या वापरामुळे लोकांच्या मनात प्रतिष्ठेची भावना निर्माण होत असल्याने ती सर्व प्रदेशात परिचयाची असते. म्हणून ती प्रमाणभाषा बनते.
५. प्रमाणभाषेत समाजात घडून येणारे सर्व सांस्कृतिक बदलू सामावून घेण्याइतका लवचिकपणा असतो. बोलीभाषेत लवचिकपणा नसतो.
६. प्रमाणभाषेचा रेखीवपणा बोलीभाषेमध्ये नसतो, उलट बोलीचा जिवंतपणा प्रमाणभाषेमध्ये उणावलेला असतो.
७. समाजाच्या व्यापक व्यवहाराचे विनिमय साधन म्हणून प्रमाणभाषेला काम करावे लागते. यालट बोली हे समाजाचे दैनंदिन व्यवहाराचे मर्यादित क्षेत्रातील माध्यम असते.
८. प्रमाणभाषा ही लिपीबद्ध असते, तर बहुतेक बोलींना लिपी नसते.
९. प्रमाणभाषेतून लुप्त झालेले जुने शब्द किंवा व्याकरणिक रुपे बोलीच्या वर्तमान स्वरुपात जशीच्या तशी राहिलेली आढळून येतात. गोमंतकी- कोकणीने यादवकालीन मराठी रुपे जपून ठेवली आहेत.

बोलीतील शब्द वा रुपे कित्येकदा खूपच जिवंत असतात. नियमबद्ध आणि औपचारिक बनलेल्या प्रमाणभाषेतील शब्द व रुपे कित्येकदा वापरातल्या नाण्यांप्रमाणे गुळगुळीत झालेली असतात. मराठी भाषेतील कित्येक साहित्यिकांनी बोलीच्या रासवटपणातून शैलीदृष्ट्या नवचैतन्य मिळविलेले दिसून येते. उदा. श्री. म. माटे, द.मा. मिरासदार, शंकर पाटील,उद्धव शेळके, रा.रं. बोराडे, आनंद यादव इ.

**निष्कर्ष :**

१. लोकव्यवहाराची भाषा ही बोली भाषा असते. ग्रांथिक व्यवहाराची भाषा ही प्रमाणभाषा असते.
२. बोलीभाषांनाच कालांतराने प्रमाणभाषेचा दर्जा मिळतो.
३. प्रमाणभाषा ही बोलीच्या तुलनेत शुद्ध मानली जाते.
४. प्रमाणभाषा व बोलीभाषा यात उजवे आणि डावे करता येत नाही.
५. ग्राम जीवनाचे सर्व पातळीवरुन चित्रण केले जात असेल तर बोली भाषेचा स्वीकार करणे अपरिहार्य ठरते.

**संदर्भ :**

१. भाषाविज्ञान परिचय - डॉ. स.गं. मालशे, दत्तात्रय पुंडे, अंजली सोमण
२. भाषाशास्त्र विचार - र.बा. मंचरकर
३. सुलभ भाषाविज्ञान- डॉ. द.दि. पुंडे

Current Global Reviewer

ISSN 2319-8648

Peer Reviewed

ISSN 2319-8648

Impact Factor - 7.139

UGC Approved Journal
Sr. No. 64310



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur

Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in